# राज्यशास्त्र मंडळाच्या अध्यक्षपदी डॉ. लक्षटे

**देगलूर / प्रतिनिधी**



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या राज्यशास्त्र अभ्यास मंडळाच्या अध्यक्षपदी अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालय देगलूर येथील राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.रत्नाकर लक्षटे यांची बिनविरोध निवड झाली आहे. निवड महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ च्या तरतुदी नुसार करण्यात आली. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार राज्यशास्त्र विषयाचा पदवी व पदव्युत्तर वर्गाचा अभ्यासक्रम बनवणे व राज्यशास्त्र विषयाशी संबंधित अन्य शैक्षणिक कार्य करण्यासाठी झाली. ग्रामीण भागातील महाविद्यालयास हा बहुमान मिळाला आहे. प्रा.डॉ.रत्नाकर लक्षटे यांच्या मार्गदर्शनात राज्य शास्त्र संशोधन केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना पीएच.डी. पदवी प्राप्त झाली आहे. विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मार्फत त्यांनी महाराष्ट्रातील लिंगायत समाजाची सामाजिक- आर्थिक व राजकीय स्थिती व समस्यांचा अभ्यास या विषयावर बृहद प्रकल्प पूर्ण केला.संस्थाध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर, शशिकांत चिद्रावार, नारायण मैलागिरे, सूर्यकांत नारलावार,विलास तोटावार , कार्यकारिणी सदस्य राजकुमार महाजन, डॉ. कर्मवीर उनग्रतवार, गंगाधर जोशी, जनार्दन चिद्रावार, रवींद्रअप्पा द्याडे, देवेंद्र मोतेवार,चंद्रकांत नारलावार प्राचार्य डॉ मोहन खताळ, डॉ.अनिल चिद्रावार ,एम.एम.चमकुडे, प्रा संग्राम पाटील,डॉ. बी.आर.कतुरवार , कार्यालयीन अधीक्षक गोविंद जोशी, प्रा.डॉ.माधव चोले, प्रा.मल्हारी सोनकांबळे यांनी त्यांचे कौतुक केले.

Scanned with OKEN Scanner